**<u>उलटतपास शपथेवर प्रतिवादीतर्फे वकील श्री.ए.एल.डोंगे यांच्यामार्फत सुरु</u>:-**

**९.** माझे शिक्षण एम.कॉम. बी.एड. झालेले आहे. मी शेती व्यवसाय करतो. मौजे हिप्पळगाव ते बेलूर हे अंतर १३ ते १४ किमी आहे. मी वादातील खरेदीखताला साक्षीदार म्हणून रामदास सुर्यवंशी व सुभाष सुर्यवंशी यांच्या सांगण्यावरुन गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मला न्यायालयाचे समन्स नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या सांगण्यावरुन मी न्यायालयात हजर आहे. हे म्हणणे खरे नाही की, काय साक्ष द्यायची याबाबत माझी वादीसोबत चर्चा झाली आहे. माझी रामदास सुर्यवंशी व सुभाष सुर्यवंशी यांच्यासोबत सन १९८७ सालापासून ओळख आहे. ते माझे लांबचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादीसोबत माझे चांगले संबंध आहेत. प्रतिवादी क्र.२ ते ३ चे वडील व प्रतिवादी क्र.४ चे पती रामदास यांना प्रतिवादी क्र.२ व ३ ही मुले व एक मयत मुलगी होती.

**१०.** प्रतिवादी सुर्यकांत याने वादी सुभाष याला किती क्षेत्राची विक्री केली हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र.२ ते ३ चे मयत वडील रामदास यांना प्रतिवादीने किती क्षेत्राची विक्री केली हेही मला सांगता येणार नाही. मला या खरेदीखतच्या चतु:सीमा सांगता येणार नाहीत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, दोन्ही खरेदीखताच्या एकत्रीत चतु:सीमा मी सांगू शकतो. सुभाष व रामदास यांना विक्री करण्यात आलेल्या क्षेत्राचा किती मोबदला ठरला होता हे मला सांगता येणार नाही.

**११.** प्रतिवादीने त्याला रक्कमेची गरज असल्यामुळे सदरच्या जमिनी विकल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीला कोणत्या कारणासाठी पैशांची गरज होती, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, किती रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर दोन्ही खरेदीखत दस्त तयार करण्यात आले, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील जमीन बेलूर गावाचे कोणत्या दिशेला आहे, हे मला माहिती नाही. खरेदीखताचा दस्त चाकूर येथे लिहिण्यात आला होता. दस्त लेखकाचे नाव मला सांगता येणार नाही. दस्त १९९१ साली करण्यात आले होते, निश्चित तारीख मला सांगता येणार नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त खरेदीखतांवर मी साक्षीदार म्हणून सही केली, हे मी खोटे सांगत आहे. प्रतिवादी हैद्राबाद येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतानंतर प्रतिवादी व माझी भेट झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीची वादग्रस्त खरेदीखतावर

नि.दि.दावा क्र.०४/२०२२
सुभाष वि. सुर्यकांत
निशाणी क्र.९ वर



सही नाही, ते खरेदीखताचे दिवशी हैद्राबाद येथे होते. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त खरेदीखतावर प्रतिवादीच्या खोटया सहया करण्यात आल्या. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त खरेदीखतासोबत प्रतिवादीचे ओळखपत्र जोडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-
**( आर.डी. वाबळे )**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदपूर.

दिनांक- ०६/११/२०२५